# ऋणनिर्देश

**या** शोध निबंधाचे काम पूर्ण करण्यास ज्यांनी मला सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे आवश्यक आहे. सर्वप्रथम या शोध निबंधाचा विषय निवडण्यापासून ते शोधनिबंधाचे काम पूर्ण करणेस ज्यांची प्रेरणा व अनमोल मार्गदर्शन लाभले ते माझे मार्गदर्शक महाराष्ट्रातील जेष्ठ पुरोगामी विचारवंत आदरणीय प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक चौसाळकर सर यांचा मी शतशः ऋणी आहे. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व बहुमूल्य मार्गदर्शनामुळे तसेच त्यांनी माझ्या अडचणी समजावून घेतल्यामुळे या शोधनिबंधाला पूर्णत्व प्राप्त झाले आहे. हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी राज्यशास्त्र विभागातील डॉ. सौ. वासंती रासम, प्रा. डॉ. लक्ष्मीनारायण तरोडी, प्रा. सौ. भारती पाटील यांचेही मला वेळोवेळी मार्गदर्शन लाभले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**शो**धनिबंधासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल अनेकांचा हातभार आहे. यामध्ये मार्गदर्शक डॉ. अशोक चौसाळकर सर यांचे पुन्हा एकदा आभार मानतो. शोधनिबंधासाठी महत्वपूर्ण मदत व प्रोत्साहन देणारे सांगोला तालुक्याचे माजी रोहयो व पणनमंत्री, विद्यमान आमदार, रोहयोचा एक अभ्यासू व्यक्ती मा. ना. गणपतराव देशमुख (आबासाहेब) यांचे या शोधनिबंधासाठी साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचेही मी आभार मानतो. या शोधनिबंधासाठी माहिती देणारे लोटेवाडी, कटफळ आणि इटकी या गावातील रोहयो मजूरांचे आभार मानतो. या तीन गावातील शेतकरी, सरपंच यांचे ही आभार मानतो. रोहयोची अंमलबजावणी करणारे सांगोला तालुक्यातील अधिकाऱ्यांचे महत्वाचे योगदान मिळाले आहे.

**हा** शोधनिबंध पूर्ण करण्याच्या कामी आर्थिक सहाय्य व प्रोत्साहन मिळाले ते माझे आई, वडिल, भाऊ आप्पा व शिवाजी तसेच घरातील आणि घराबाहेरील नातेवाईकांच्या प्रोत्साहनामुळे हा सगळा पट क्षणार्धात उलगडला आणि शोधनिबंध पूर्तीचा आनंद कृतार्थतेचे समाधान देता आला. या सर्वांचे मी आभारी आहे.

**ह्या** शोधनिबंधाचे काम वेळेवर पूर्ण करून देणारे टंकलेखक विनायक पाटील यांचाही मी आभारी आहे. तसेच या शोधनिबंधाच्या कार्यात ज्याची मला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत झाली त्या सर्वांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

धन्यवाद!

स्थान - कोल्हापूर
दिनांक - जानेवारी, २००७.

बाळासाहेब ब. सरगर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.